# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १७३-२२** **दिनांक :- ०९/०६/२०२२**

## कॅन्टीनमध्ये काम करणाऱ्या कामगाराचा खून करणाऱ्या २ आरोपीतांना पोलीसांनी केली अटक.

दिनांक ०७/०६/२०२२ रोजी नवघर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र-४३२/२०२२ भादविसं कलम ३०२, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल असून यातील फिर्यादी नामे मोहम्मद ताहीर मोहम्मद हसीमुद्दीन आलम, वय २० वर्षे, रा-भाईंदर पूर्व यांनी फिर्याद दिली की, फिर्यादी हे रबर इंडस्ट्रिज, भाईंदर-फाटक रोड, भाईदर पूर्व येथील कॅन्टीनमध्ये काम करतात व त्याच ठिकाणी राहतात. त्यांचा सोबत इसम नामे सलमान अली, रमजान अली व सज्जाद अशरफ अली हे देखील वरील कॅन्टीनमध्ये काम करतात व राहतात. फिर्यादी व सदरील व्यक्ती हे कॅन्टीनमधुन कंपनीतील सर्व कामगारांना चहा व नाष्टा देण्याचे काम करतात. दिनाक ०६/०६/२०२२ रोजी रात्री २२.०० वा चे सुमारास रमजान अली व सज्जाद अली हे दोघे कपंनीतील कामगार यांना चहा देण्यासाठी गेले होते. तेव्हा कंपनीतील कामगार नामे उपेन्द्र श्रीकांत चौहान व सुरज छांगुर राजभर यांनी त्यांच्यासोबत वाद घातला होता. त्यानंतर परत सदरील कंपनीच्या गेटसमोर रात्री २३.१५ वा उपेंद्र चौहाण व सुरज राजभर यांनी सज्जाद अश्रफुल अली वय- १६ वर्ष यास मारहाण केली तसेच उपेंद्र चौहाण याने सज्जाद अली याचावर चाकुने वार करुन त्याचा खून केला

नमुद गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने सदर गुन्हयाच्या घटनास्थळी पोलीस उप-आयुक्त श्री विजयकांत सागर, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री शशीकांत भोसले व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे यांनी गुन्हयाच्या घटनास्थळाला भेट देवुन त्यांनी गुन्हयाच्या तपासाचे अनुषंगाने सुचना दिल्या होत्या. वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे तसेच गुन्हयाच्या घटनास्थळावर असणारे तांत्रिक पुराव्याच्या आधारावर तपासा दरम्यान आरोपी नामे सुरज झांगुर राजभर वय-२२ वर्षे व उपेंद्र श्रीकांत चौहाण वय १८ वर्षे यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयातील अटक आरोपीतांना मा. न्यायालयाने दिनांक १३/०६/२०२२ रोजी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली असुन सदर गुन्हयाचा पुढिल तपास पोनि. श्री सुशीलकुमार शिंदे हे करीत आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय) अती. कार्य. पोउपआ. परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग, श्री. अमोल मांडवे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/अविराज कुराडे गुन्हे शाखा-०१, पोनि/सुशिलकुमार शिंदे (गुन्हे), पोनि/प्रकाश मासाळ (प्रशासन), सपोनि/योगेश काळे, पोउनि/अभिजीत लांडे, पोहवा/भुषण पाटील, पोना/गणेश जावळे, पोशि. संदिप जाधव, सुरज घुनावत, ओंमकार यादव व विनोद जाधव तसेच गुन्हे शाखा-०१ चे सपोनि/कैलास टोकले, पोह/मुस्तकीन पठाण, पुष्पेंद्र थापा, विजय गायकवाड, अविनाश गर्जे, संतोष लांडगे, संजय शिंदे, पोशि/विकास राजपुत, सुमित जाधव यांनी केलेली आहे.

--------------ooooo---------------